# यजमान निर्मल स्कूलला सर्वसाधारण विजेतेपद

## महाराष्ट्र- गोवा कबड्डी स्पर्धा

**सकाळ वृत्तसेवा**

पाचोरा, ता. २६ : येथील निर्मल इंटरनॅशनल स्कूलमध्ये दिमाखात पार पडलेल्या महाराष्ट्र- गोवा राज्य व राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत यजमान निर्मल स्कूलला सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त झाले. मुलींच्या संघाने नेत्रदीपक चढाई व खेळ करून विजयश्री मिळविल्याने आनंद व्यक्त होत आहे.

केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्डाच्या १७ व १९ वर्षे वयोगटाच्या महाराष्ट्र गोवा राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेचे यजमानपद येथील निर्मल स्कूलला मिळाले. मॅटवरील कबड्डी स्पर्धा खानदेशात प्रथमच येथे झाल्या. यात महाराष्ट्र व गोवा राज्यातील १७ व १९ वर्षे वयोगटातील ५६ संघ व ७० खेळाडू सहभागी झाले होते. त्यात १७ वर्षे गटात मुलांचे २९ व मुलींचे ११ तसेच १९ वर्षे गटात मुलांचे १० व मुलींचे ६ संघ होते. तीन दिवस चाललेल्या या स्पर्धांचे उद्‌घाटन आमदार किशोर पाटील यांच्याहस्ते झाले. माजी आमदार तथा निर्मल फाउंडेशनचे संस्थापक आर. ओ. पाटील अध्यक्षस्थानी होते. निरीक्षक बाबासाहेब उलपे (कोल्हापूर), वैशाली सूर्यवंशी, ॲड. नरेंद्रसिंग सूर्यवंशी, कमल पाटील, मेहताबसिंग नाईक, रवी केसवानी, बी. जी. पवार, अभिजित शिंदे, ईश्वर शिंदे, भगवान सावंत, प्रदीप सोनवणे उपस्थित होते.

**कलागुणदर्शनाचा कार्यक्रम**

यावेळी निर्मल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचा कार्यक्रम सादर केला. अभिजित शिंदे व ईश्वर शिंदे यांनी जिम्नशियमची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. आमदार किशोर पाटील,




**पाचोरा : महाराष्ट्र- गोवा कबड्डी स्पर्धेतील विजयी मुलींच्या संघाला गौरविताना वैशाली सूर्यवंशी. शेजारी ॲड. नरेंद्रसिंग सूर्यवंशी, भगवान सावंत आदी.** **(छायाचित्र : प्रा. सी. एन. चौधरी)**

बाबासाहेब उलपे व भगवान सावंत यांची भाषणे झाली. वैशाली सूर्यवंशी यांनी संस्थेच्या सर्वांगीण विकासाचा आढावा घेतला. त्यानंतर स्पर्धा रंगल्या. नामवंत खेळाडूंसह कबड्डीपटूंची मांदियाळी येथे अनुभवायला मिळाली. १७ वर्षे गटाचा मुलांचा अंतिम सामना सेंट्रलनगरविरुद्ध निर्मल स्कूल संघात झाला. त्यात नगरचा संघाचा विजेता तर पाचोरा उपविजेता ठरला. मुलींच्या संघात ठाणे संघाला नमवत परभणी संघाने विजय मिळविला. १९ वर्षे वयोगटाच्या मुलींच्या संघाचा सामना अत्यंत चुरशीचा झाला. त्यात दौंड येथील दत्त कला संघावर आक्रमक चढाई करीत निर्मल स्कूलच्या संघाने विजयश्री मिळविली. मुलांच्या स्पर्धेत कोल्हापूरचा संघ विजयी झाला. निर्मल स्कूलची पूजा पाटील सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली. विजयी संघांना आर. ओ. पाटील, वैशाली सूर्यवंशी, ॲड नरेंद्रसिंग सूर्यवंशी, भगवान सावंत, सुशांत जाधव, प्रदीप सोनवणे यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. यजमान निर्मल स्कूलच्या संघाने १९ वर्षे गटाची मुलींची स्पर्धा जिंकल्याने तसेच १७ वर्षे गटाच्या मुलांच्या संघाने उपविजेते पद पटकावल्याने निर्मलला सर्वसाधारण विजेतेपद मिळाले.